प्रकरण ५ वे

# कुंभारी ग्रामपंचायत विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी (२००२-२००७)

# प्रकरण ५ वे
# कुंभारी ग्रामपंचायत विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी (२००२-२००७)

प्रस्तुत प्रकरणामध्ये कुंभारी ग्रामपंचायतीचा कारभार, ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची साधने तसेच ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या माध्यमातून कोणकोणती कामे करण्यात आली याचा थोडक्यात गोषवारा घेण्यात आला आहे. याशिवाय सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे कुंभारी ग्रामपंचायतीने सन २००२ ते २००७ या १० व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत कोणकोणती विकास कामे पूर्ण केली याचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

**ग्रामपंचायतीचा कारभार :**

''ग्रामपंचायतीला कार्यक्षमपणे कार्य करता यावे आणि स्थानिक स्वराज्याचा घटक या नात्याने महत्वाची भूमिका पार पाडता यावी म्हणून त्यांना व्यापक अधिकार देण्याच्या आणि त्यांची कर्तव्ये वाढविण्याच्या इराद्याने सरकारने ग्रामपंचायतीचा कायदा केला. आर्थिक विकासाकरिता आणि सामाजिक न्यायाकरिता विकासाच्या योजना करण्याचा आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार भारताच्या राज्यघटनेने ग्रामपंचायतीला दिला आहे.

कारभाराकरिता आपण लोकशाही पद्धत स्वीकारली आहे. लोकशाहीच्या पद्धतीप्रमाणे गावातील लोक त्यांचे प्रतिनिधी निवडून देतात आणि ग्रामपंचायतीचा कारभार त्यांच्यावर सोपवितात. निवडून गेलेले सदस्य त्यांच्यापैकी एकाची सरपंच म्हणून आणि एकाची उपसरपंच म्हणून निवड करतात.

सरपंच आणि उपसरपंच हे ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आहेत. त्यापैकी सरपंच ग्रामपंचायतीचा कारभार पाहतात. सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंच हे ग्रामपंचायतीचा कारभार पाहतात. तसेच सरपंचाच्या मदतीला शासनाने ग्रामसेवक हा अधिकारी नेमला आहे. तो ग्रामपंचायतीचा सचिव म्हणून काम करतो.

ग्रामपंचायतीचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. जी जी कामे करावयाची असतील ती ग्रामपंचायतीच्या सभेपुढे चर्चेला घ्यावी लागतात. सर्व घेतलेले निर्णय सर्व सदस्यांनी घेतलेले असतात, ते सरपंचाचे एकट्याचे नसतात, लोकशाही तत्वानुसार घेतलेल्या निर्णयानुसार ग्रामपंचायतीचा कारभार चालतो.

हा कारभार करण्याकरिता सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामसेवक यांची कर्तव्ये कायद्याने ठरवून दिली जातात. तसेच त्यांना काही अधिकार देऊन त्यांच्यावर जबाबदाऱ्याही टाकल्या जातात.''[१]

''ग्रामपंचायत सदस्यांना ग्रामपंयातीच्या हद्दीत राहावे लागते. परंतु ग्रामपंचायतीची परवानगी घेऊन हद्दीबाहेर राहता येते. अशी परवानगी सहा महिन्यापेक्षा जास्त मिळत नाही. तसेच ग्रामपंचायतीच्या प्रत्येक सभेस हजर राहणे हे सदस्यांचे कर्तव्य आहे. जर सभेस हजर राहता येत नसेल तर अर्ज करून गैरहजर राहण्यची परवानगी घेता येते.

ग्रामपंचायतीचे कर आणि देणी वेळच्यावेळी देणे, ग्रामपंचायतीची मालमत्ता बेकायदेशीररित्या स्वत: न वापरणे, ग्रामपंचायतीच्या मालमत्तेचे नुकसान न करणे इ. जबाबदाऱ्यांचे पालन करणे प्रत्येक सदस्याचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीची मालमत्ता कोणासाठी बेकायदा वापरू न देणे ग्रामपंचायतीच्या मालमत्तेचे कोणास नुकसान करू न देणे, ग्रामपंचायतीचे कर आणि देणी वेळच्यावेळी देण्यास लोकांना सांगणे इ. गोष्टींची जबाबदारी सदस्यांवर येऊन पडते. अशाप्रकारे ग्रामपंचायतीच्या सर्व प्रकारच्या मालमत्तेची देखभाल ग्रामपंचायतीमार्फत करण्याची जबाबदारी सर्व सदस्यांवर आहे.''[२]

''याशिवाय ग्रामपंचायतीच्या सचिवपदाची संपूर्ण जबाबदारी ग्रामसेवकावर आहे. काही ग्रामपंचायतींनी स्वत:चा नोकरवर्ग नियुक्त केला आहे. परंतु त्यांच्याकडून कामे करून घेण्याची जबाबदारी ग्रामसेवकावर आहे. ग्रामपंचायतीकडे सोपविलेल्या कामाच्या उत्पन्नाचे व खर्चाने अंदाजपत्रक तयार करण्याकरिता माहिती तयार करणे आणि सरपंचाना ती माहिती देणे हे ग्रामसेवकाचे कर्तव्य आहे. सर्व साधारण ग्रामपंचायतीचे दप्तर सांभाळण्याची जबाबदारी ग्रामसेवकाकडे असते.''[३]

वरीलप्रमाणे सर्वसाधारण ग्रामपंचायतीचा कारभार सर्वत्र चाललेला आपणास दिसून येतो.

**ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची साधने :**

''ग्रामपंचायतीच्या कारभाराकरिता पैशाची गरज असते. हा पैसा ग्रामपंचायतीस पुढीलप्रमाणे मिळतो.

१) ग्रामपंचायतीला सरकारकडून अनुदाने मिळतात.

२) ग्रामपंचायतीला इतर साधनांपासून उत्पन्न मिळते.

**जमीन महसूल अनुदान :**

ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील वसूल केलेल्या जमीन महसुलाची १००% रक्कम ग्रामपंचायतीला 'जमीन महसूल अनुदान' या नावाने मिळते. जमीन महसुलाचे अनुदान दरडोई किमान १ रूपया मिळावे असे धोरण आहे. ज्या ग्रामपंचातींना लोकसंख्येइतके जमीन महसूल अनुदान मिळत नसेल त्यांना ते दरडोई १ रूपया मिळावे म्हणून हिशोब करून फरकाची रक्कम समीकरण अनुदान म्हणून देतात.

**उपकर अनुदान :**

जमीन महसुलावरील कार्यक्षेत्रातील काही हिस्सा ग्रामपंचायतीला मिळतो. सद्या १ रूपया शेतसाऱ्यामागे २० पैसे उपकर अनुदान म्हणून ग्रामपंचातीला मिळतात.

**गौण खनिजे अनुदान :**

ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील वाळू, दगड, माती इत्यादीची विक्री शासन करते. त्याविक्रीच्या २०% रक्कम गौण खनिजे अनुदान म्हणून ग्रामपंचायतीला देतात.

**मुद्रांक शुल्क अनुदान :**

ग्रामपंचायत हद्दीत होणाऱ्या शेतजमीनीच्या खरेदी-विक्रीसाठी स्टॅम्पचा वापर केला जातो. त्या स्टॅम्पचया विक्रीच्या ५०% हिस्सा ग्रामपंचातीला स्टॅम्प डयुटी म्हणून दिला जातो.

**आदिवासी /मागासवर्गीय ग्रामपंचायत अनुदान :**

ज्या ग्रामपंचायती आदिवासी किंवा मागासवर्गीय म्हणून कायद्याने ठरविण्यात आल्या आहेत. त्यांना ५००/- रूपये अनुदान मिळते.

**वित्त आयोग अनुदान :**

७३ व्या घटनादुस्तीनुसार वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार हे अनुदान आहे.''[४]

**जवाहर रोजगार योजना निधी :**

''केंद्र सरकार ग्रामपंचातींना जवाहर रोजगार योजनेखाली निधी देते. त्या निधीतून कोणती कामे करावीत हे ठरविलेले आहे. हा निधी त्याच कामासाठी खर्च करावा लागतो. हा निधी लोकसंख्येच्या प्रमाणा माणशी विशिष्ट दराने मिळतो. मागासवर्गीय व आदिवासी लोकसंख्येस हा निधी जास्त दराने मिळतो.''[५]

**विशिष्ट योजनेसाठी अनुदान :**

"बालवाड्यांच्या इमारती, शाळागृहे, समाज मंदिरे, सार्वजनिक विहीरी, शौचकूप, गटारे इ. योजना राबविण्यासाठी ग्रामपंचातीला अनुदाने मिळतात. ज्या योजनेला अनुदान मिळाले असेल त्याच योजनेच्या कामासाठी ते खर्च करावे लागते. इतर कामांसाठी खर्च करता येत नाही."[६]

**ग्रामनिधी :**

"अनुदाने, कर आणि इतर प्रकारचे जे उत्पन्न ग्रामपंचायतीला मिळते, ते ग्रामपंचातीच्या निधीत जमा होते. त्यास ग्रामनिधी असे म्हणतात. हा निधी प्रथम बँकेत भरून त्यानंतर कामाकरति जशी लागेल तशी रक्कम काढता येते. क्ष निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत किंवा राष्ट्रीयकृत बँकेत किंवा पोष्टात वेगवेगळी खाती उघडून ठेवावा लागतो."[७]

याबरोबरच ग्रामपंचायतीस दिवाबत्ती कर, आरोग्य कर, पाणीपट्टी कर, बाजार कर, करमणूक कर, सार्वजनिक जागेचा भोगवटा कर, कोंडवाडा फी व दंड तसेच लोकवर्गणी व दान देणग्या इत्यादींच्या माध्यमातून उत्पन्न मिळते.

अशाप्रकारे "ग्रामपंचायतीला निरनिराळ्या मार्गाने उत्पन्न मिळत असले तरी ग्रामपंचायतीने काढलेले कर्ज व जमा केलेल्या लोकवर्गण्या, ग्रामपंचातीला मिळालेल्या देणग्या, जवाहर रोजगार योजनेचा निधी आणि विशिष्ट योजनेसाठी मिळालेली अनुदाने तसेच ग्राम पाणीपुरवठा निधी वगळता इतर सर्व उत्पन्नाला ग्रामपंचायतीचे उत्पन्न समजतात. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातून कोणती कामे करावीत, ती कामे १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाने आणि वेळोवेळी काढलेल्या सरकारी ठरावांनी ठरवून दिली आहेत. ग्रामपंचातीच्या उत्पन्नातून तीच कामे करता येतात. इतर कामे करता येत नाहीत."[८]

ग्रामपंचातीच्या उत्पन्नातून काही कामे इतर कामांच्या अगोदर करावी लागतात. ती कामे आणि त्यावर किती रक्कम सर्व करावी हे पुढे दिले आहे.

| ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातून करावयाची कामे | ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातील किती खर्च करावा त्याचे प्रमाण |
|---|---|
| १. ग्रामपंचायतीचा सामान्य कारभार | जास्तीत जास्त २५% पर्यंत रक्कम |
| २. मागासवर्गीयाच्या कल्याणाची कामे | १५% रक्कम |
| ३. महिला व बालविकासाची कामे | १०% |
| ४. जिल्हा ग्राम विकास निधीची वर्गणी | ५% |
| ५. रस्त्यावरील दिवाबत्तीची देखभाल<br>६. आरोग्य व स्वच्छता<br>७. ग्रामपंचायतीच्या मालमत्तेची देखभाल<br>८. राष्ट्रीय सण आणि समारंभ<br>अतिथी भत्ता | २% रक्कम किंवा ६०००/- रूपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |

संदर्भ – ग्रामपंचायत प्रशासन तोंडओळख

हा खर्च केल्यावर ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातील उरलेल्या रक्कमेतून विकासाची कामे करता येतात. विकासाची नवी कामे ठरविण्यापूर्वी चालू असलेली अपूर्ण कामे अगोदर पूर्ण करावी लागतात.

अशाप्रकारे ग्रामपंचायतीचा कारभार, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या तसेच ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची वेगवेगळी साधने यांचा एक सर्वसाधारण आढावा घेतल्यानंतर कुंभारी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या माध्यमातून सन २००२–२००७ या कालावधीत ग्रामपंचायतीने केलेली कामे व झालेला खर्च याचा ताळेबंद खालीलप्रमाणे दिला आहे.

## सन २००२-२००३

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| १. देणगी | ६९७३ रू. | पाणीपुरवठा | ८९८०० रू. |
| २. दाखला | ८४५ रू. | गटार बांधकाम | २९०० रू. |
| ३. जागाकडे | ५४०० रू. | रस्ते, दुरूस्ती | २०५०० रू. |
| ४. घरपट्टी | ७३५५९ रू. | दिवाबत्ती | २०२३० रू. |
| ५. दिवाबत्ती कर | १२१९२ रू | आरोग्य | ५३३५ रू. |
| ६. आरोग्य कर | ८७४५ रू. | प्रवास खर्च | १५०० रू. |
| ७. सामान्यपाणीपट्टी | २२४४६ रू. | सत्कार | ५००० रू. |
| ८. नळपट्टी | १६९४९६ रू. | मोटार खरेदी | ३८००० रू. |
| ९. रजिस्टर नोंदणी फी | १३०९६ रू. | नोकर पगार | ९४००० रू. |
| १०. बांधकाम फी | ८६७ रू. | ब्लीचिंग पावडर | १५०० रू. |
| | | सरपंच मानधन | ४८०० रू. |
| | | सादील | ८८९० रू. |
| | | दलित वस्ती सुधारणा | २३६६२ रू. |
| एकूण | ३१६६१९ रू. | एकूण | ३१६११७ रू. |

संदर्भ : वार्षिक अहवाल ग्रा.पं.कुंभारी २००२-०३.

सन २००२ ते २००३ या वर्षामध्ये देणगी, दाखले, जागाभाडे, घरपट्टी, दिवाबत्ती कर, आरोग्य कर, सामान्य पाणीपट्टी, नळपट्टी, रजिस्टर नोंदणी फी व बांधकाम फी इ.च्या माध्यमातून एकूण ३१६६१९ रू. जमा झाले.

तसेच पाणीपुरवठा, गटार बांधकाम, रस्ते दुरूस्ती, दिवाबत्ती, आरोग्य, प्रवासखर्च, सत्कार, मोटार खरेदी, नोकर पगार, ब्लिचिंग पावडर, सरपंच मानधन, सादिल व दलित वस्ती सुधारणा इ. बाबींवर ३१६११७ रू. खर्च झालेला आहे.

## सन २००३-२००४

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| १. देणगी | ७६३६ रू. | पाणीपुरवठा | ११३५८२ रू. |
| २. दाखला | ६०६रू. | गटार बांधकाम | ११५०० रू. |
| ३. जागा भाडे | ६७७० रू. | रस्ते बांधकाम | २३५०० रू. |
| ४. घरपट्टी | ११८६०७ रू. | दिवाबत्ती | ४०५०० रू. |
| ५. दिवाबत्ती कर | १४२३० रू. | आरोग्य | ६२८२ रू. |
| ६. आरोग्य कर | ११९६५ रू. | प्रवास खर्च | ३००० रू. |
| ७. सामान्यपाणीपट्टी | २६५९५ रू. | सत्कार | ५००० रू. |
| ८. नळपट्टी | ९८३२० रू. | दलितवस्ती सुधारणा | २५००० रू. |
| ९. रजिस्टर नोंदणी फी | १५९७५ रू. | नोकर पगार | ५२००० रू. |
| १०. बांधकाम फी | ९०० रू. | सादील | ३१०० रू. |
| | | सरपंच मानधन | ४८०० रू. |
| एकूण | ३०१६०४ रू. | एकूण | २८८२६४ रू. |

सदंर्भ - वार्षिक अहवाल ग्रा.पं. कुंभारी २००३-०४.

सन २००३-२००४ या वर्षात देणगी, दाखले, जागाभाडे, घरपट्टी, दिवाबत्ती कर, आरोग्य कर, सामान्य पाणीपट्टी, नळपट्टी, रजिस्टर नोंदणी फी व बांधकाम फी इ. साधनांच्या माध्यमातून ३०१६०४रू. जमा झाले.

तर या जमा रक्कमेचा खर्च पुढील बाबीवर करण्यात आला. पाणीपुरवठा, गटारबांधकाम, रस्ते बांधकाम, दिवाबत्ती, आरोग्य, प्रवारस खर्च, सत्कार, दलितवस्ती, सुधारणा, नोकरपगार सादिल व सरपंच मानधन इ. हा चर्च एकूण २८८२६४ रू.इतका आहे.

## सन २००४-२००५

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| १. देणगी | ५३४६३ रू. | पाणी पुरवठा | २६५९२७ रू. |
| २. दाखला | ९५० रू. | गाजर गवत निर्मूलन | १३५५० रू. |
| ३. जागा भाडे | ३७६५८ रू. | पाणी पुरवठा लाईन दुरूस्ती | २४८५०० रू. |
| ४. अनुदान | २३९९० रू. | ब्लिचिंग पावडर | ९८९० रू. |
| ५. घरपट्टी | २०१५०१ रू. | सिमेंट बंधारा बांधकाम | २९६९९७ रू. |
| ६. दिवाबत्ती कर | ४९३४५ रू. | रस्ते व गटार बांधकाम | ८९८५० रू. |
| ७. बिन परतीची ठेव | १७००० रू. | सरपंच / सदस्य मानधन | १३४०० रू. |
| ८. खत लिलाव | २९०० रू. | दिवाबत्ती दुरूस्ती | १३३४९ रू. |
| ९. अनामत जमा | ९२७८८ रू. | वीजबील भरणा | ७०००० रू. |
| १०. आरोग्य कर | १७९६५ रू. | अनामत परत | ६७६०० रू. |
| ११. बाजार कर | ३१००० रू. | मोटार दुरूस्ती | ५००० रू. |
| १२. ११वा वित्त आयोग | २२४९९१ रू. | नोकर पगार | ११४८७० रू. |
| १३. उपकेंद्र, दुरूस्ती | ५४००० रू. | सादिल | ६१०४४ रू. |
| १४. पाणीपुरवठा अनुदान | २४९०६७ रू. | | |
| १५. सामान्य पाणीपट्टी | १०००० रू. | | |
| १६. केंद्रीय वित्त आयोग | ६७००० रू. | | |
| एकूण | ११३३६१८ रू. | एकूण | १२६९९७७ रू. |

संदर्भ : वार्षिक अहवाल ग्रा.पं. कुंभारी २००४-०५.

सन २००४-०५ या वर्षामध्ये देणगी, दाखले, जागाभाडे , अनुदान, घरपट्टी, दिवाबत्ती कर, बिनपरतीची ठेव, खत लिलाव, अनामत जमा, आरोग्य कर, बाजार कर, ११ वा वित्त आयोग, उपकेंद्र दुरूस्ती, पाणीपुरवठा अनुदान, सामान्य पाणीपट्टी, केंद्रीय वित्त आयोग इ. साधनांच्या माध्यमातून ११३३६१८ रू. जमा झाले.

तर १२६९९७७ रू पाणी पुरवठा, गाजर गवत निर्मूलन, पाणी पुरवठा पाईप लाईन दुरूस्ती, ब्लिचिंग पावरडर, सिमेंट बंधारा बांधकाम, रस्ते व गटार बांधकाम, सरपंच / सदस्य मानधन, दिवाबत्ती दुरूस्ती, वीज बील भरणा, अनामत परत, मोटार दुरूस्ती, नोकरपगार, सादिल इ. बाबीवर खर्च करण्यात आले आहेत.

## सन २००५-०६

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| १. अनुदान | १३८८६६ रू. | पाणीपुरवठा | ७७५१४ रू. |
| २. देणगी | ५४२० रू. | रस्ते दुरूस्ती | ३८९०० रू. |
| ३. दाखले | ६७० रू. | ब्लिचिंग पावडर खरेदी | १२२८० रू. |
| ४. जागा भाडे | १३७५० रू. | गटार बांधकाम | ५४४३० रू. |
| ५. घरपट्टी | २०२५९६ रू. | नाला दुरूस्ती | १८४०० रू. |
| ६. दिवाबत्ती कर | ५०००० रू. | वीजबील भरणा | १००९९२ रू. |
| ७. बिन परतीची ठेव | ४५०० रू. | मोटार हातपंप, दुरूस्ती | ३८७३६ रू. |
| ८. बाजार कर | ६००० रू. | नोकर पगार | ११५८४४ रू. |
| ९. अनामत जमा | ६४४५८ रू. | सादिल | १९६९५ रू. |
| १०. आरोग्य कर | २५००० रू. | वनराई बंधारा बांधकाम | ८०५० रु. |
| ११. रजिस्टर नोंदणी फी | ३८९५२ रू. | प्रवास खर्च | १८०० रु. |
| १२. बांधकाम फी | ५६९१ रू. | अनामत परत | ७००७५ |
| १३. नळपट्टी | १०३६७६ रू. | इमारत दुरूस्ती | ८२७०८ |
| १४. गोडाऊन भाडे | १०४०० रु. | अंगीवाणी दुरूस्ती | ७४५०० |
| १५. सामान्य पाणीपट्टी | ४२५५० रु. | | |
| एकूण | ७१२५२९ रू. | एकूण | ७१३९२४ रू. |

संदर्भ - वार्षिक अहवाल ग्रा.पं. कुंभारी २००५-२००६.

सन २००५-०६ या वर्षात कुंभारी ग्राम पंचायतीस अनुदान, देणगी, दाखले, जागा भाडे, घरपट्टी, दिवाबत्ती कर, बिनपरतीची ठेव, बाजार कर, अनामत जमा, आरोग्य कर, गोडाऊन भाडे, रजिस्टर नोंदणी फी, बांधकाम फी, सामान्य पाणीपट्टी व नळपट्टी इ. साधनांच्या माध्यमातून ७१२५२९ रुपये जमा झाले.

तर ७१३९२४ रुपये पाणीपुरवठा, रस्ते दुरूस्ती, अंगींवाडी दुरूस्ती, ब्लिचिंग पावडर खरेदी, नाला दुरूस्ती, गटार दुरूस्ती, वनराई बंधारा बांधकाम, प्रवास खर्च, वीज बील भरणा, इमारत दुरूस्ती, अनामत परत, मोटार-हातपंप दुरूस्ती, नोकर पगार व सादील इ. बाबींवर खर्च झाला.

## सन २००६-०७

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| १. अनुदान | १८२१३३ रू. | पाणीपुरवठा | ८२४०२ रू. |
| २. देणगी | १६६३८ रू. | रस्ते दुरूस्ती | ३८००० रू. |
| ३. दाखले | ५०० रू. | ब्लिचिंग पावडर खरेदी | १२२०० रू. |
| ४. जागा भाडे | १६४७५ रू. | गटार बांधकाम | १५५०० रू. |
| ५. घरपट्टी | १३०४९६ रू. | महिला स्वच्छतागृह बांधकाम | १५४००० रू. |
| ६. दिवाबत्ती कर | ४६५०० रू. | वीजबील भरणा | ७७९९० रू. |
| ७. बिन परतीची ठेव | १०००० रू. | मोटार हातपंप, दुरूस्ती | ५९००० रू. |
| ८. बाजार कर | २५०० रू. | नोकर पगार | १३५८०० रू. |
| ९. अनामत जमा | १३१२५ रू. | सादिल | १५७०० रू. |
| १०. आरोग्य कर | २८००० रू. | | |
| ११. रजिस्टर नोंदणी बिले | ६११८७ रू. | | |
| १२. बांधकाम फी | ४६७३ रू. | | |
| १३. नळपट्टी | ८२४४७ रू. | | |
| एकूण | ५९४६७४ रू. | एकूण | ५९४५९७ रू. |

संदर्भ - वार्षिक अहवाल ग्रा.पं. कुंभारी २००६-२००७.

सन २००६-२००७ या वर्षात कुंभारी ग्रामपंचायतीस अनुदान, देणगी, दाखले, जागाभाडे, घरपट्टी, दिवाबत्ती कर, बिन परतीची ठेव, बाजार कर, अनामत जमा, आरोग्य कर, रजिस्टर नोदणी फी, बांधकाम फी आणि नळपट्टी इ.च्या माध्यमातून ५९४६७४ रू. जमा झाले.

तर ५९४५९७ रू. पाणीपुरवठा, रस्तेदुरूस्ती, ब्लिचिंग पावडर खरेदी, गटार बांधकाम, महिला स्वच्छतागृह बांधकाम, वीज बील भरणा, मोटार हातपंप दुरूस्ती, नोकर पगार,सादिल इ. बाबींवर खर्च झाला.

अशापद्धतीने सन  २००२-२००७ या कालावधीमध्ये कुंभारी ग्रामपंचायतीने आपल्या उत्पन्नाच्या तसेच सरकारी अनुदान, वेगवेगळे कर यांच्या माध्यमातून लोकोपयोगी कामे केलेली आहेत. याशिवाय इतर काही महत्वपूर्ण योजना २००२-२००७ (१० वी पंचवार्षिक योजना) मध्ये कुंभारी ग्रामपंचायतीने राबविल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

**जवाहर रोजगार योजना :**

कुंभारी ग्रापंचायतीने सन २००२-२००७ या १० व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत जवाहर रोजगार योजनेखाली वॉर्ड क्रमांक १ ते ५ मध्ये जमीन अंतर्गत गटारीचे बांधकाम पूर्ण केले आहे. तसेच बौद्ध वस्तीमध्ये व गावात रस्त्याचे बांधकाम (डांबरी आणि सिमेंट) पूर्ण केले आहे. त्याचा तपशिल थोडक्यात पुढील प्रमाणे :

**जवाहर रोजगार योजना (२००२-२००७)**

| वॉर्ड क्रमांक | काम | वर्ष | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १) | रस्ता बांधकाम | २००६-२००७ | २००००० रू. |
| २) | गटार बांधकाम | २००२-२००३ | १५००००रू. |
| ३) | गटार बांधकाम | २००३-२००४ | २७००००रू. |
| ४) | गटार बांधकाम | २००४-२००५ | २५०००० रू. |
| ५) | गटार बांधकाम | २००५-२००६ | १३०००० रू. |
| | एकूण | | १०००००० रू. |

संदर्भ : कुंभारी ग्रा.पं. दप्तर.

जवाहर रोजगार योजनेअंतर्गत सन २००२-२००७ या काळात कुंभारी गावामध्ये ३ समाज मंदिरे बांधण्यात आली आहेत. त्याचे वर्णन पुढील प्रमाणे करता येईल.

**समाज मंदिर बांधकाम ( २००२-२००७)**

| वॉर्ड | काम | वर्ष | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १) | समाजमंदिर बांधकाम | २००२-२००३ | १६०००० रू. |
| १) | समाजमंदिर बांधकाम | २००३-२००४ | १६०००० रू. |
| ५) | समाजमंदिर बांधकाम | २००६-२००७ | १६०००० रू. |
| | | एकूण | ४८०००० रू. |

संदर्भ : कुंभारी ग्रा.पं. दप्तर.

**११ वा वित्त आयोग :**

११ व्या वित्त आयोगाअंतर्गत कुंभारी गावामध्ये ३ बालवाड्यांचे बांधकाम कुंभारी ग्रामपंचायतीने पूर्ण केले आहे. तसेच दलित वस्तीमध्ये गटारीचे बांधकाम, पुल बांधकाम इ. कामे या योजनेअंतर्गत पूर्ण झालेली आहेत. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**११ वा वित्त आयोग (२००२-२००७)**

| अ.क्र. | कामाचे ठिकाण | कामाचे स्वरूप अंगणवाडी बांधकाम | वर्ष | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | मुस्लीम गल्ली | अंगणवाडी बांधकाम | २००२-०३ | २००००० रू. |
| २. | विजयनगर | अंगणवाडी बांधकाम | २००३-०४ | १५०००० रू. |
| ३. | धनगर गल्ली | अंगणवाडी बांधकाम | २००३-०४ | १५०००० रू. |
| ४. | दलित वस्ती | गटार बांधकाम | २००२-०३ | १५०००० रू. |
| ५. | दलित वस्ती | पूल बांधकाम | २००२-०३ | २५०००० रू. |
| | | एकूण | | ९००००० रू. |

संदर्भ : कुंभारी ग्रा.पं. दप्तर.

**इंदिरा आवास योजना :**

इंदिरा आवास योजने अंतर्गत कुंभारी गावामध्ये सन २००२-०७ या पंचवार्षिक योजनेमध्ये, दरवर्षी चार मागास जातीच्या लोकांना व दोन सर्वसाधारण जातीच्या लोकांना पंचायत समितीमार्फत घरकुल बांधण्यासाठी एका लाभार्थ्यास २८५०० रू. प्रमाणे या पाच वर्षात ३० लोकांना या योजनेचा लाभ झाला असून त्यामुळे या लाभार्थ्यांस राहण्यास चांगले घर उपलब्ध झाले आहे. याची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे :

## इंदिरा आवास योजना – २००२–२००७

| अ.क्र. | लाभार्थी संख्या | | वर्ष | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| | मागास | सर्वसाधारण | | |
| १. | ४ | २ | २००२–०३ | १७१००० रू. |
| २. | ४ | २ | २००३–०४ | १७१००० रू. |
| ३. | ४ | २ | २००४–०५ | १७१००० रू. |
| ४. | ४ | २ | २००५–०६ | १७१००० रू. |
| ५. | ४ | २ | २००६–०७ | १७१००० रू. |
| एकूण | २० | १० | एकूण | ८५५००० रू. |

संदर्भ : कुंभारी ग्रा.पं.दप्तर.

अशा पद्धतीने कुंभारी ग्रामपंचायतीने सन २००२–२००७ या १० व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत वेगवेगळी विकास कामे पूर्ण केलेली आहेत. ज्याचा फायदा सर्वसामान्य लोकांना खूप मोठ्या प्रमाणात झाला आहे. याबरोबरच कुंभारी ग्रामपंचायतीस राष्ट्रसंत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियांनाअंतर्गत सन २००२–०३ मध्ये तालुका पातळीवरील तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस (रू. १००००) मिळालेले आहे. तसेच गावामध्ये हागणदारीमुक्त गाव योजनेचे काम प्रगतीपथावर असून ६०% पूर्ण झाले आहे. (संदर्भ ग्रा.पं. दफ्तर ).

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) डॉ. चौधरी नारायण, चौधरी अविनाश, मुसळे सोपान, **'स्थानिक प्रशासन : ग्रामीण व नागरी'**, प्रकाशक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – २००६ पृ.क्र. ४१,४२

२) उपरोक्त, पृ.क्र.४४.

३) उपरोक्त पृ.क्र. ४५.

४) डॉ. विभूते भालबा, **'ग्रामपंचायत प्रशासन तोंडओळख'**, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००६, पृ.क्र. १७,१८.

५) उपरोक्त, पृ. क्र.१९.

६) उपरोक्त, पृ.क्र. २०.

७) उपरोक्त, पृ.क्र. २०.

८) उपरोक्त पृ.क्र. २०,२१.